RNI No. MAHBIL /2009/37831

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार-ब

वर्ष १०, अंक १४] शुक्रवार, जानेवारी २६, २०२४/माघ ६, शके १९४५ [पृष्ठे २, किंमत : रुपये ९.००

असाधारण क्रमांक ४९

### प्राधिकृत प्रकाशन

महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले
(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.

### सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय,
मुंबई ४०० ०३२, दिनांक २६ जानेवारी २०२४.

### अधिसूचना

**महाराष्ट्र अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागासप्रवर्ग (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) अधिनियम, २०००.**

क्रमांक सीबीसी-२०२४/प्र.क्र.०२/मावक.—महाराष्ट्र अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागासप्रवर्ग (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) अधिनियम, २००० (सन २००१ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.२३) याच्या कलम १८ च्या पोट-कलम (१) अन्वये प्रदान करण्यात आलेल्या आणि याबाबतीत त्यास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागासप्रवर्ग (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) नियम, २०१२ यात सुधारणा करण्यासाठी जे नियम करण्याचे योजिले आहे, त्या नियमांचा पुढील मसुदा हा, त्यामुळे बाधा पोचण्याची शक्यता असलेल्या सर्व व्यक्तींच्या माहितीकरिता, उक्त अधिनियमाच्या कलम १८ च्या पोट-कलम (१) द्वारे आवश्यक असल्याप्रमाणे, याद्वारे, प्रसिद्ध करण्यात येत आहे आणि याद्वारे अशी नोटीस देण्यात येत आहे की, उक्त मसुदा, महाराष्ट्र शासनाकडून **दिनांक १६ फेब्रुवारी २०२४** रोजी किंवा त्यानंतर विचारात घेण्यात येईल.

२. उपरोक्त दिनांकापूर्वी, उक्त मसुद्याच्या संबंधात, कोणत्याही व्यक्तीकडून ज्या कोणत्याही हरकती किंवा सूचना सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, दालन क्र.१३६ व १३७, पहिला मजला, विस्तार इमारत मंत्रालय, हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२ यांचेकडे उपरोक्त दिनांकास किंवा त्यापूर्वी प्राप्त होतील, त्या शासन विचारात घेईल.

### नियमांचा मसुदा

१. या नियमांस, महाराष्ट्र अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागासप्रवर्ग (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) (सुधारणा) नियम, २०२४ असे म्हणावे.

२. महाराष्ट्र अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागासप्रवर्ग (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) नियम, २०१२ यांच्या नियम २ त्यातील मधील उप नियम (१) मधील खंड (ज) नंतर खालील उपखंड समाविष्ट करण्यात येईल :—

**(ज) (एक) सगेसोयरे .—** सगेसोयरे या वर्गातील नातेवाईक म्हणजे अर्जदाराचे वडील, आजोबा, पणजोबा व त्यापूर्वीचे पिढ्यामध्ये जातीमधील झालेल्या लग्न नातेसंबंधातून पुढे निर्माण झालेले नातेवाईक असा असेल. यामध्ये सजातीय विवाहातून जे नातेसंबंध तयार झाले आहेत, त्यांचा समावेश असेल.

**नियम क्र. ५ मधील उप-नियम (६) मध्ये क्रमशः पुढीलप्रमाणे तरतूद जोडण्यात येत आहे :—**

कुणबी नोंद मिळालेल्या नागरिकांच्या रक्तनात्यातील काका, पुतणे, भाऊ-भावकीतील असा नातेवाईक तथा पितृसत्ताक पध्दतीतील सगेसोयरे ते सर्व नातेवाईक अथवा सगेसोयरे आहेत. अर्जदाराने असे शपथपत्र पुरावा म्हणून उपलब्ध करून दिल्यास तथा गृहचौकशी करून नोंद मिळालेल्या त्यांच्या रक्तातल्या सग्यासोयऱ्यांना कुणबी जात प्रमाणपत्र तपासणी करून तात्काळ देण्यात येईल. कुणबी जातीची नोंद मिळालेल्या नागरिकांच्या एक नातेसंबंधातील पुरावा आढळल्यास नोंद मिळालेल्या नागरिकांच्या रक्तनाते संबंधातील सदस्यांचे शपथपत्र महाराष्ट्र अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागासप्रवर्ग (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) नियम, २०१२ नुसार घेऊन त्यांनाही तपासून तात्काळ कुणबी जात प्रमाणपत्र देता येतील.

ज्या मराठा बांधवांची कुणबी नोंदी सापडल्या आहेत, त्याच नोंदीच्या आधारानुसार त्यांच्या गणगोतातील सर्व सग्यासोयऱ्यांना वरील बांधवांच्याच नोंदीचा आधार घेऊनच सर्व सग्यासोयऱ्यांना कुणबी जात प्रमाणपत्र देण्यात येतील.

ज्या मराठा व्यक्तींची कुणबी नोंदी सापडली आहे त्यांचे सगेसोयरे म्हणजे, मराठा समाजात परंपरेनुसार सगोत्रांशी लग्नाच्या सोयरिकी होतात ते सर्व सगेसोयरे, मात्र सगेसोयरे यांना सर्व साधारणपणे अर्थ पितृसत्ताक पध्दतीचे नातेवाईक असा मानला जाईल तसा लग्नाच्या ज्या सोयरिकी होतात त्या गणगोतात आहेत किंवा सजातीय आहेत याचा पुरावा उपलब्ध करून दिल्यास, गृहचौकशी करून त्यांनाही कुणबी प्रमाणपत्र देण्यात येईल.

कुणबी नोंद मिळालेल्या नागरिकांच्या राज्याअंतर्गत सजातीय झालेल्या विवाहातून तयार झालेल्या नातेसंबंधातील सग्यासोयऱ्यांना जात प्रमाणपत्र मिळणेसाठी अर्ज सादर करता येईल. मात्र या तरतुदीचा दुरुपयोग करता येऊ नये, म्हणून सदर विवाह सजातीय आहे, यासंदर्भातील पुरावा देणे तथा गृह चौकशीत तसा प्रकारचा पुरावा मिळणे, हे देखील आवश्यक असेल व याची पूर्तता झाल्यास त्यांनाही कुणबी जातप्रमाणपत्र देता येतील.

सदरची अधिसूचना अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागास वर्ग व विशेष मागास प्रवर्गासाठी लागू राहील.

**नियम क्र. १६. अर्जदाराकडून पुरविण्यात यावयाची माहिती यामध्ये :-**

(ज) उपलब्ध असल्यास, पडताळणी समितीच्या निर्णयाची साक्षांकित प्रत आणि/किंवा अर्जदाराच्या रक्तसंबंधातील वडिलांचे किंवा सख्ख्या चुलत्याचे किंवा वडिलांकडील रक्तसंबंधातील इतर कोणत्याही नातेवाईकाचे किंवा सगेसोयरे यांचे वैधता प्रमाणपत्र.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

सुमंत भांगे,

शासनाचे सचिव.

## SOCIAL JUSTICE AND SPECIAL ASSISTANCE DEPARTMENT

Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk,
Mantralaya, Mumbai 400 032, dated the 26th January 2024.

*NOTIFICATION*

MAHARASHTRA SCHEDULED CASTES, SCHEDULED TRIBES, DE-NOTIFIED TRIBES (*VIMUKTA JATIS*), NOMADIC TRIBES, OTHER BACKWARD CLASSES AND SPECIAL BACKWARD CATEGORY (REGULATION OF ISSUANCE AND VERIFICATION OF) CASTE CERTIFICATE ACT, 2000.

No. CBC-2024/C.R.02/MAVAK:- The following draft of rules which the Government of Maharashtra proposes to amend the Maharashtra Scheduled Castes, De-notified Tribes (*Vimukta Jatis*), Nomadic Tribes, Other Backward Classes and Special Backward Category (Regulation of Issuance and Verification of) Caste Certificate Rules, 2012 issued in exercise of the powers conferred by section 18 of the Maharashtra Scheduled Castes, Scheduled Tribes, De-notified Tribes (*Vimukta Jatis*), Nomadic Tribes, Other Backward Classes and Special Backward Category (Regulation of Issuance and Verification of) Caste Certificate Act, 2000 (Mah. XXIII of 2001), and of all other powers enabling it in that behalf, is hereby published as required by the said sub-section (*1*) of section 18, for information of all persons likely to be affected thereby; and notice is hereby given that the said draft rules shall be taken into consideration by the Government of Maharashtra on or after **16th February, 2024.**

2. Any objections or suggestions which will be received by the Secretary, Social Justice and Special Assistance Department, Room No.136 and 137, 1st Floor, Annex Building, Hutatma Rajguru Chowk, Madam Cama Road, Mantralaya, Mumbai 400 032, from any person with respect to the said draft on or before the aforesaid date, shall be considered by the Government.

*DRAFT RULES*

1. These rules may be called the Maharashtra Scheduled Castes, De-notified Tribes (*Vimukta Jatis*), Nomadic Tribes, Other Backward Classes and Special Backward Category (Regulation of Issuance and Verification of) Caste Certificate (Amendment) Rules, 2024.

2. In rule 2 (definition) of the Maharashtra Scheduled Castes, De-notified Tribes (*Vimukta Jatis*), Nomadic Tribes, Other Backward Classes and Special Backward Category (Regulation of Issuance and Verification of) Caste Certificate Rules, 2012 (hereinafter referred to as "the principal Rules"), in sub-rule (*1*), after clause (*h*), the following clause shall be inserted, namely :

"(*h*)(*one*) "***Sage-soyare***"-The term *Sage-soyare* includes relatives of the applicant's father, grandfather, great grandfather and in earlier generations forming out of marriages within the same castes. This will include relations forming out of marriages within the same caste".

**In Rule 5 of the Principal Rules, in sub-rule (6), the following provisos shall be respectively added, namely :—**

"Provided further that, upon submitting an affidavit by the applicant establishing the relations with his blood relatives *i.e.* Uncle, Nephew and other members of his family as well as patriarchal relatives who have found *Kunbi* records being the applicant's *Sage-soyare* and after verifying such kunbi certificates of blood relatives and *Sage soyare* by conducting field enquiry and verification, *Kunbi* caste certificate shall be issued immediately. *Kunbi* caste certificate shall immediately be issued to the blood relatives of the persons upon finding record of being *Kunbi*, after presenting an affidavit establishing their relationship with such persons under The Maharashtra Scheduled Castes, De-notified Tribes (*Vimukta Jatis*), Nomadic Tribes, Other Backward Classes and Special Backward Category (Regulation of Issuance and Verification of) Caste Certificate Rules, 2012 :

Provided also that, all the *Sage-soyare* being in relation of the persons belonging to Maratha community, whose record of being *Kunbi* has been found shall be given the *Kunbi* caste certificates on the basis of the *Kunbi* records of such persons belonging to Maratha community:

Provided also that, the *sage-soyare* of the person belonging to Maratha community whose *Kunbi* record has been found, shall be the one amongst the relations within whom the marriages are been held traditionally. But the *sage-soyare* shall be considered among the relations/relatives from the patriarchal relatives as well as the relations forming out of marriages and proof being given to prove that the marriage is within the same caste, the *Kunbi* caste certificate shall be issued after field enquiry:

Provided also that, the relatives, being *sage-soyare* forming out of marriages within same caste in the State, of person who has the record of being *Kunbi*, may apply for *Kunbi* caste certificate. Provided that, proof of such marriage is within same caste be submitted as well as be established in the field enquiry and upon verification of the documents related to such *Kunbi* records and after following due procedure thereof, the Competent Authority shall issue *Kunbi* caste certificate to the applicant:

Provided also that, the provisions of above provisos shall be applicable to the Scheduled Castes, De-notified Tribes (*Vimukta Jatis*), Nomadic Tribes, Other Backward Classes and Special Backward Category for issuance of caste certificate."

**Rule No. 16. Information to be provided by the applicant includes :—**

(*k*) Attested copy of decision of Scrutiny Committee and of Validity Certificate of applicant's father in blood relation or real uncle or any other relative of the applicant in blood relation from paternal side or sage-soyare, if available.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

SUMANT BHANGE,
Secretary to Government.